

भडगाव : शिंदे इंजिनिअरिंगमध्ये आयोजित कार्यशाळेप्रसंगी एस. एच. सावंत, एस. बी. पाटील, एस. आर. महाडिक, एस. एस. नागतिलक व अन्य.

# ए. डी. शिंदे इंजिनिअरिंगमध्ये कार्यशाळा

**गडहिंग्लज :** भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकी शैक्षणिक अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलासोबत अध्यापन पद्धती अद्ययावत होण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकी अभ्यासक्रम बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एस. एच. सावंत होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. एस. बी. पाटील, एस. आर. महाडिक, एस. एस. नागतिलक यांनी मार्गदर्शन केले. महादेव बंदी यांच्यासह शिक्षकांनी कार्यशाळेचे संयोजन केले. यावेळी संस्थाध्यक्षा ऊर्मिला शिंदे, सचिव स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी आदी उपस्थित होते. श्वेता भोई यांनी सूत्रसंचालन केले. अभिषेक मगदूम यांनी आभार मानले.

# डॉ. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये कार्यशाळा



**जनप्रवास : गडहिंग्लज**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकी शैक्षणिक अभ्यासक्रमात होणाऱ्या बदला सोबत अध्यापन पद्धती अद्यावत होण्यासाठी गरजेचे असल्याने याबाबत ही कार्यशाळा शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने झाली. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकी अभ्यासक्रम बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एस. एच. सावंत होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी अभ्यास मंडळाच्या सदस्याचे स्वागत केले. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. के. आर. देसाई व डॉ. एस. आर. प्रसाद तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. एस. यु. सपकाळ यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विशेष करून बदलत्या औद्योगिक जगतास अभिप्रेत असणाऱ्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती व सृजनशील विचारधारा जोपासणारा विद्यार्थी या जोगे अध्यापन आवश्यक असणाऱ्या पद्धती व अभ्यासक्रम यावर विचारविमर्श झाला. प्रा. महादेव बंदी, प्रा. गुरुराज कुंभार व प्रा. अभिजित बोरगावे यांच्यासह शिक्षकांनी कार्यशाळेचे नियोजन केले. यावेळी संस्थाध्यक्षा उर्मिला शिंदे, सचिव प्रा. स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी आदी उपस्थित होते. प्रा. इरफान त्रासगर यांनी आभार मानले.



भडगाव : डॉ. शिंदे कॉलेजमध्ये प्रतिमापूजनाने कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. संजय सावंत, डॉ. एस. बी. पाटील, डॉ. एस. आर. महाडिक, डॉ. एस. एस. नागतिलक, डॉ. डी. व्ही. घेवडे आदी उपस्थित होते.

# डॉ. शिंदे इंजिनिअरिंगमध्ये शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

गडहिंग्लज, ता. २५ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व शिवाजी विद्यापीठातर्फे नवीन शैक्षणिक धोरणातंर्गत अभियांत्रिकी शैक्षणिक अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलासोबत अध्यापन पद्धती अद्ययावत होण्यासाठी गरजेचे असल्याने कार्यशाळा झाली.

विद्यापीठ अभियांत्रिकी अभ्यासक्रम बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एस. एच. सावंत अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी अभ्यास मंडळाच्या सदस्यांचे स्वागत केले. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सौ. एस. बी. पाटील, डॉ. सौ. एस. आर. महाडिक, डॉ. एस. एस. नागतिलक यांनी मार्गदर्शन केले. प्रा. महादेव बंदी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. संस्थाध्यक्ष ऊर्मिलादेवी शिंदे, सचिव सौ. स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन झाले.

दैनिक सकाळ कोल्हापूर ,गुरुवार 26-09-2024 पान नं.5

# 'शिंदे इंजिनिअरिंग'मध्ये अध्यापन पद्धत कार्यशाळा



भडगाव : डॉ. ए. डी. शिंदे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये डॉ. एस. एच. सावंत यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे. शेजारी डॉ. के. आर. देसाई, डॉ. एम. आर. प्रसाद, डॉ. एस. यु. सपकाळ.

गडहिंग्लज, ता. २ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकी शैक्षणिक अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलासोबत अध्यापन पद्धती अद्ययावत होणे गरजेचे असून, याबाबत कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठ व डॉ. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली.

अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ अभियांत्रिकी अभ्यासक्रम बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एस. एच. सावंत होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. के. आर. देसाई व डॉ. एस. आर. प्रसाद, मेकॅनिकल इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. एस. यू. सपकाळ यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत कुशल मनुष्यबळाची निर्मिती व सृजनशील विचारधारा जोपासणारा विद्यार्थी, व अभ्यासक्रम यावर विचारविमर्श झाला. प्रा. महादेव बंदी, प्रा. गुरुराज कुंभार व प्रा. अभिजित बोरगावे यांच्यासह शिक्षकांनी कार्यशाळेचे नियोजन केले. संस्थाध्यक्षा ऊर्मिला शिंदे, सचिव प्रा. स्वाती कोरी, सल्लागार महेश कोरी आदी उपस्थित होते. प्रा. इरफान त्रासगर यांनी आभार मानले.